**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

**करार पध्दतीने नियुक्ती**

ग्राम विकास व जलसंधारण विभागांतर्गत जलसंधारण उप विभागात करार पध्दतीने नियुक्तीसाठी खालीलप्रमाणे निश्चित केलेल्या विवक्षित कामकाजासाठी अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**कामाचे स्वरुप :-**

१. जलसंधारण विभागाचा स्वतंत्र संवर्ग निर्माण करणे, विभागाच्या क्षेत्रिय यंत्रणेची पुनर्रचना करणे.

२. जलसंधारण विभागाच्या आकृतीबंधानुसार मंजूर असलेली पदे भरण्यासाठी एक वर्षाच्या मुदतीत सेवाप्रवेश नियम तयार करणे तसेच सर्व रिक्त पदांवर भरती करण्यासाठी पाठपुरावा करणे.

३. जलयुक्त शिवार प्रकल्पाच्या कामकाजाचे मॉनिटरींग करणे.

**करार पध्दतीने नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१) वरील प्रमाणे कामकाजासाठी करार पध्दतीने नियुक्तीसाठी एक उप सचिव किंवा अवर सचिव, एक उपविभागीय कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी,एक उपविभागीय अभियंता, दोन कक्ष अधिकारी,एक सांख्यिकी सहायक, एक सहायक कक्ष अधिकारी व एक लिपिक-टंकलेखक यांची नियुक्ती करावयाची आहे.

२) उपरोक्त पदांसाठी इच्छुक उमेदवार मंत्रालयीन विभागातील/ क्षेत्रिय कार्यालयातुन त्या त्या संवर्गातील पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

३) उमेदवाराला प्रशासकीय स्तरावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.

४) उमेदवाराचे वय दि. १/११/२०१६ रोजी ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

५) उमेदवाराविरुध्द शासन सेवेत असताना कोणतीही शिस्तभंग विषयक कारवाई झालेली नसावी किंवा प्रलंबित नसावी.

६) लिपिक-टंकलेखक पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास टंकलेखनाच्या विहीत अर्हता पुर्ण करणे आवश्यक आहे.

७) नियुक्तीच्या कालावधीत सोपविलेले विवक्षित काम पुर्ण करण्याचे हमी पत्र उमेदवाराला देणे बंधनकारक राहील.

८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. ८ जानेवारी, २०१६ मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्तीचे पालन करुन त्याच्या सेवा निवृत्ती वेतनाच्या आधारे उमेदवाराची पारिश्रमीकाची रक्कम निश्चित करण्यात येईल.

९) उमेदवारांची कंत्राटी नियुक्ती १ वर्षासाठी राहील. तथापि, आवश्यकता भासल्यास नियुक्तीस मुदतवाढ देण्याबाबत विचार केला जाईल.

१०) ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दिनांक १५ एप्रिल,२०१७ पर्यन्त त्यांचे उमेदवारी अर्ज सादर करावेत.

११) उमेंदवाराने आपला अर्ज कोऱ्या कागदावर त्यांचा नाव, पत्ता, संर्पक क्रमांक, स्वत: चे छायाचित्र, शासकीय कामाचा अनुभव इत्यादी तपशीलासह आपला अर्ज सचिव ( जलसंधारण ) यांच्या नावे वरील पत्यावर विहित मुदतीत प्राप्त होईल अशा बेताने पाठवावा.

१२) अर्ज प्राप्त होणाऱ्या इच्छुक उमेदवारांमधून मुलाखतीद्वारे पात्र उमेंदवाराची निवड करण्यात येणार आहे.

१३) करार पदधतीने नियुक्तीच्या कालावधीत करावयाच्या कामाचे निश्चित स्वरूप जाणून घेण्यासाठी आवश्यकता असल्यास उमेदवाराने श्री.अं.सा.चंदनशिवे, अवर सचिव यांच्याशी शासनाच्या कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०२२५२६ वर संर्पक साधावा.

**सही/-**

( असिम गुप्ता )

महाराष्ट्र शासनाचे सचिव (जलसंधारण),

ग्राम विकास व जलसंधारण विभाग.